जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २५१ दिनांक :- १०/०९/२०२१

# अल्पवयीन मतिमंद मुलीवर अत्याचार करण्या-यास २४ तासात जेरबंद करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

-------00000-------

दिनांक ०७/०९/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजे ते रात्रौ ११.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी वय-३६ वर्षे, रा-वसई पुर्व, ता .वसई, जि. पालघर यांची अल्पवयीन मतिमंद मुलगी वय १६ वर्षे, हिस कुणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या परीसरातून मोटार सायकलवरुन बळजबरीने अज्ञात ठिकाणी घेवुन जावुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले बाबत फिर्यादी यांनी दि. ०९/०९/२०२१ रोजी वालीव पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि नंबर ९९३/२०२१ भा.दं.वि. कलम ३७६ (२) (के) (एम), ३६६ (अ) सह बा.लै.अ.सं.अधि २०१२ चे कलम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर घटनेची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभिर्याने दखल घेवुन सदरील गुन्हा उमाळीस आणणेबाबत आदेशीत केले होते. गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथक यांनी सदर गुन्हयातील आरोपीत याचे बाबत गुप्त बातमीदार यांचेकडुन खात्रिशिर माहिती प्राप्त करुन आरोपीत याचा हवाईपाडा, गौराईपाडा, अन्नाडिस कंम्पाऊन्ड, संतोषभुवन परिसरात कसुन शोध घेवुन एक पुरुष आरोपीत - वय ३१ वर्षे, धंदा- बिगारी काम, रा. अन्नाडिस कंम्पाऊन्ड, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. यास गुन्हा नोद झाल्या नंतर २४ तासाच्या आत कौशल्यपुर्वक रित्या ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हे अनुषंगाने तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद बडाख, पोउपनिरी. शिवाजी खाडे, सफौ. अनिल वेळे, पो.ना. १९९१ मुकेश तटकरे, पो.ना. १०३८ सागर बारवकर, पो.ना. २०३२ शंकर शिंदे, पो.ना. १६२७ सचिन घेरे, पो.अं. १८५० राकेश पवार, पो.अं. १८५३ अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष-३ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

----0000----